# ठाणे महानगरपालिकेचा वार्षिक अर्थसहाय्य अहवाल
# सन २००७-२००८

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याच्या विधीमंडळाने राज्यातील सर्वच महानगरपालिकांना, नगरपालिकांची अंदाजपत्रके सादर करतेवेळी, वार्षिक अर्थसहाय्य अहवाल सादर करणे आवश्यक ठरविले आहे. निर्णय घेणा-यांना सेवांच्या पातळया आणि प्रशुल्क यांच्यासंबंधातील निर्णय घेणे शक्य व्हावे म्हणून उपलब्ध होणारे एक साधन म्हणून ते उपयुक्त ठरते.

**सुधारणा / महाराष्ट्र अधिनियमातील तरतुदी :**

महाराष्ट्र अधिनियम सन १९९४ चा ४१ याच्या कलम ७१ अन्वये नव्याने दाखल करण्यांत आलेल्या कलम ९५ अ ने सेवा पुरविण्यांत अंतर्भूत असलेल्या अर्थसहाय्यांच्या मर्यादा कळवण्याच्या गरजेवर भर दिला आहे. अधिनियमातील तरतूद पुढीलप्रमाणे आहे.

१. आयुक्त किंवा, यथास्थिती, परिवहन व्यवस्थापक, अर्थसंकल्पीय अंदाज स्थायी समितीला सादर करतेवेळी एक अहवाल त्याबाबत जोडील व त्यात आदल्या वर्षात खाली नमूद केलेल्या सेवा अर्थसहाय्यित तत्वावर पुरवण्यांत आल्या का आणि तशा त्या पुरवल्या असतील तर, अर्थसहाय्याची मर्यादा, अर्थसहाय्याची रक्कम ज्यातून भागविण्यांत आली तो स्त्रोत आणि अशा अर्थसहाय्याचे लाभधिकारी असलेले स्थानिक लोकांचे गट किंवा प्रवर्ग या बाबींचा निर्देश केलेला असेल, त्यासेवा अशा :-

अ. पाणी पुरवठा
ब. मलनिःसारण
क. घनकचरा व्यवस्थापन
ङ रस्त्यावरील दिवाबत्ती

२. स्थायी समिती किंवा यथास्थिती, परिवहन समिती तो अहवाल तपशील आणि तिच्या काही शिफारशी असल्या तर त्यासह तो अहवाल महानगरपालिकेपुढे ठेवील. स्पष्टीकरण : एखादया सेवेचा एकूण खर्च, ती चालविणे व तिची देखभाल यावरील खर्च सेवेच्या मालमत्तांवरील घसा-यासाठी आणि ऋणखर्चासाठी पुरेशी तरतूद धरुन ती सेवा पुरवण्याशी ज्याचा संबंध जोडता येऊ शकेल अशा उत्पन्नापेक्षा जास्त असेल, अशी सेवा ही अर्थसहाय्यित तत्वावर दिली जाते असा अर्थ लावला जाईल.

१. खाली नमूद केलेल्या सेवा देण्यासाठी दिल्या जाणा-या अर्थसहाय्यांचा (प्रगट व गर्भित ) आवाका आणि शहराच्या वित्त व्यवस्थेवर त्यांचा पडणारा बोजा आणि नगरपालिकेकडून पुरवल्या जाणा-या अन्य सेवांतील गुंतवणुकीच्या स्वरुपांतील त्यांचा परिणाम परिमाणबद्ध करणे.

अ. पाणी पुरवठा
ब. मलनिःसारण
क. घनःकचरा
ङ रस्त्यावरील दिवाबत्ती

२. अर्थसहाय्य एखादया स्वीकार्य मर्यादिपर्यंत कमी करण्यासाठी एखादी योजना (धोरणात्मक पुस्तकांसह) विकसित करणे.

**अ) पाणी पुरवठा :**

**पाणी विक्रीचे उत्पन्न :**

पाण्याच्या विक्रीच्या उत्पन्नामुळे प्राप्त होणारा महसूल, पाणी लाभ कर, पाणी आकार आणि टँकरने पुरवलेल्या पाण्याच्या विक्रीतून मिळालेला महसूल यापुढे दिसेल. पाण्यामुळे जो काही एकूण महसूल मिळतो त्यातील ९० टक्के महसूल पाण्याच्या विक्रीतून मिळालेल्या उत्पन्नाचा असतो.

**घरगुती वापराच्या पाणीपट्टीचे दर :**

| वर्ष | झोपडपट्टी / बैठया चाळी प्रती महिना /प्रतीधारक | वर्ष | इमारती व संकुलनासाठी प्रती कुटुंब /प्रती सदनिका |
|---|---|---|---|
| २००२-२००३ | रु. ४५/- | २००२-२००३ | रु.९०/- |
| २००३-२००४ | रु.५२/- | २००३-२००४ | रु.१०५/- |
| २००४-२००५ | रु. ६०/- | २००४-२००५ | रु.१२०/- |
| २००५-२००६ | रु.७०/- | २००५-२००६ | रु. १४०/- |
| २००६-२००७ | रु.८०/- | २००६-२००७ | रु. १६०/- |

| तपशील | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|---|---|
| १. जललाभ कर | ५,८५,२८,९७७ | ७,३९,१४,१४७ | ९,०२,३६,९४८ | ९,६५,९३,११५ | १०,६२,४५,९३८ |
| २. सर्व घरगुती /व्यापारी जोडण्यासाठी सरसकट दर आकारुन मिळालेले उत्पन्न | २२,००,५५,७१५ | ३०,७१,२९,७०३ | ३२,५४,७४,८०१ | ३४,२९,०२,९४७ | ४०,९९,०८,९२७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. टँकरने पाणी विक्रीचे उत्पन्न | १०,९६,२०५ | १४,३२,७३५ | ११,५३,७४५ | ५,३७,७५० | ५,०४,१०० |
| एकूण (२+३) | २२,११,५१,९२० | ३०,८६,६२,४३८ | ३२,०२,७२,३७९ | ५३,६६,२६,९२७ | ४१,०४,१३,०२७ |
| **एकूण (१+२+३)** | **२७,९६,८०,८९७** | **३८,२४,७६,५८५** | **४१,६८,६५,४९४** | **४४,००,३३,८१२** | **५१,६६,५८,९६५** |

**पाणी खरेदी खर्च :** अंदाजे ६० टक्के खर्च मुंबई महानगरपालिका, एम.आय.डी.सी. आणि स्टेम यांचेकडून करावयाचे पाणी खरेदीवरील आहे. सद्यःस्थितीत खालील संस्थांकडून पाणी खरेदी केली जाते.

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई महानगरपालिका | ३० द.ल.लि. | दर रु.४.०० | प्रती १००० लिटर |
| | ३० द.ल.लि. | दर रु.८.०० | प्रती १००० लिटर |
| एम.आय.डी.सी. | ८० द.ल.लि. | दर रु.८.०० | प्रती १००० लिटर |
| स्टेम | १२२ द.ल.लि. | दर रु.४.५० | प्रती १००० लिटर |

उपरोक्त नमूद केलेल्या दरानुसार मागील ५ वर्षात पाणी खरेदीकरीता करण्यांत आलेला खर्च खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| १ | २००२-०३ | ४४,५४,१३,९०९ |
| २ | २००३-०४ | ४९,३१,६१,७७२ |
| ३ | २००४-०५ | ५५,९९,९९,६६६ |
| ४ | २००५-०६ | ६४,५४,४७,३८७ |
| ५ | २००६-०७ | ६२,५३,५८,०९२ |

**२. देखभाल दुरुस्तीवरील खर्च :** महानगरपालिकेची स्वतःची १०० द.ल.लि. पाणी पुरवठा योजना अंमलात आल्यानंतर विजेचा खर्च तसेच त्याअनुषंगाने येणारा पंपिगचा खर्च वाढलेला आहे. देखभाल दुरुस्तीवरील मागील ५ वर्षातील खर्च खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| १ | २००२-०३ | ६४,८०,२२,८०३ |
| २ | २००३-०४ | ७७,८७,९२,६३० |
| ३ | २००४-०५ | ८०,७८,९७,८७० |
| ४ | २००५-०६ | ९२,१२,२५,४६९ |
| ५ | २००६-०७ | ९१,९६,८६,८७४ |

## ३. दायित्व :

### पाणी पुरवठा योजनांसाठी उभारलेले कर्ज :

सद्यःस्थितीत ठाणे महानगरपालिकेवर रुपये १५१.८६ कोटीचे कर्ज असून त्यापैकी पाणी पुरवठा योजनेकरीता घेतलेल्या कर्जाची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

| कर्ज देणारी संस्था | | व्याजाचा दर | उभारलेले कर्ज | शिल्लक कर्ज |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | | ०६.७५% | २९.४३ कोटी | २.१६ कोटी |
| एम.एम.आर.डी.ए. | १०० द.लि.लि. | ०३.००%<br>०६.००% | १५.३४ कोटी<br>१६.२० कोटी | ९.०९ कोटी<br>१०.२७कोटी |
| | १००द.लि.लि. वितरण व्यवस्था | ०३.००%<br>०६.००% | १२.०३ कोटी<br>१२.६२ कोटी | ८.८७ कोटी<br>९.७६ कोटी |
| | १० th plan | ०६.००% | २४.४२ कोटी | २४.४२ कोटी |
| बँक ऑफ महाराष्ट्र | | ०९.५०% | २५.५२ कोटी | १५.९५ कोटी |
| बँक ऑफ महाराष्ट्र | | ०९.५०% | ८०.००कोटी | ५४.५५ कोटी |
| **एकूण** | | | **२१५.५६कोटी** | **१३५.०७ कोटी** |

**इतर दायित्व** (वादग्रस्त देणी ) : ठाणे महानगरपालिका महाराष्ट्र जीवन प्राधिकरण , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून पाणी खरेदी करते. या संस्थांपैकी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व एम.आय.डी.सी. यांचेकडून खरेदी करण्यांत आलेल्या पाण्यांच्या बिलांबाबत वाद निर्माण झाला होता. सद्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ठाणे महानगरपालिकेकडे रु. ११९.३६ कोटी रकमेची थकबाकी दर्शविली आहे. यापैकी रु. २१.९२ कोटी मूळ थकीत रक्कम व रु.९७.४४ कोटी एवढी विलंब शुल्काची रक्कम दर्शविण्यांत आली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या हिशेबाप्रमाणे महापालिकेस मान्य असलेल्या सर्व रकमा भरलेल्या आहेत. सदरचा वाद हा प्रामुख्याने पाण्याच्या दराबाबतचा आहे. एम.आय.डी.सी.च्या बाबतीत महापालिकेकडे एकूण रु. २१८.७४ कोटीची थकबाकी असल्याचे दर्शविले आहे. एम.आय.डी.सी. चा वाद संपुष्टात आलेला आहे मात्र अद्यापही एम.आय.डी.सी.च्या बिलात पाण्याच्या थकबाकीच्या रकमा दर्शविण्यांत येतात. सारांशाने ठाणे महानगरपालिकेकडे रु.३३८.१० कोटी वादग्रस्त देणी दिसत आहेत.

**नियोजित प्रकल्प व योजना :**

**१. मिटरींग पद्धती :** - ठाणे महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत केंद्र शासन व राज्य शासन यांच्यासमवेत करार केलेला आहे. या कराराच्या अंतर्गत रिफार्म अजेंडाचा भाग म्हणून महानगरपालिकेस १००% मिटरींग करावयाचे आहे. यामध्ये खालीलप्रमाणे वर्षनिहाय मिटरींचे काम पूर्ण करणे अपेक्षित आहे.

सन २००७-०८ - ५० %
सन २००८-०९ - ५०%

मा.महासभा ठराव क्रमांक १८ दि.१८.४.२००७ अन्वये मिटरींग पद्धत व पाण्याचे दर निश्चित करण्याबाबत मंजूरी दिली आहे. घरगुती पाणी वापराचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पाण्याचे दर (रु.) | पाणी वापर (प्रति कुटुंब /महिना ) |
|---|---|---|
| १. | रु.५.०० | २०,००० लिटरपर्यंत |
| २. | रु.६.५० | २०,००० ते २४,००० लिटर |
| ३. | रु.८.०० | २४,००० लिटरच्या पुढे |

उपरोक्त नमूद ठरावान्वये व्यावसायिक दरामध्ये कोणतीही वाढ प्रस्तावित नाही. व्यावसायिक पाणी वापराचे दर हे यापुर्वीच्याच मा.महासभा ठराव क्रमांक १४० दि.१८.१.२००५ अन्वये निश्चित केल्याप्रमाणे राहतील. १०० टक्के मिटरींग करण्याचे काम हे डिपीआर तयार करुन प्रस्तावित करण्यांत आले आहेत. याबाबतचा डिपीआर तयार करण्याचे काम सुरु असून डिपीआर तयार झाल्यानंतर केंद्र शासनास सादर करुन १०० टक्के मिटरिंगची अंमलबजावणी सन २००८-०९ मध्ये करण्यांत येणार आहे.

**पाण्याचे लेखापरिक्षण** : ठाणे महानगरपालिकेने संपूर्ण वितरण व्यवस्थेचे पाणी व ऊर्जा लेखापरिक्षण हाती घेतले आहे. प्रथम टप्प्यात ESR पर्यंतचे लेखापरिक्षणाचे काम पूर्ण झाले असून द्वितीय टप्प्यात संपूर्ण वितरण व्यवस्थेचे लेखापरिक्षण करण्याचे काम हाती घेतले आहे. सदरचे लेखापरिक्षण डिसेंबर २००८ अखेर पूर्ण होणे अपेक्षित असून लेखापरिक्षण पुनर्वसन कार्यक्रम हाती घेण्यांत येणार आहे. या लेखापरिक्षणामुळे पाणी वितरणात सुधारणा आणता येईल.

**अतिरिक्त १ १ ० द.ल.लि. पाणी पुरवठा योजना :**

सन २०११ व त्यापुढील लोकसंख्या विचारात घेता अतिरिक्त ११० द.ल.लि. प्रति दिन पाणी पुरवठा योजना हाती घेण्यांत आली आहे. या योजनेमध्ये भातसा उद्भवातून (पिसे बंधारा ) ११० द.ल.लि.प्रती दिन पाणी उचलून टेमघर येथे जलशुद्धीकरण केंद्रात आणण्यांत येईल. टेमघर येथे या पाण्याचे जलशुद्धीकरण झाल्यानंतर सदरचे पाणी मानकोली येथील MBR द्वारे महानगरपालिका हद्दीत सोडण्यांत येईल. ही योजना सप्टेंबर २०१० अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदरची योजना पूर्ण झाल्यानंतर ठाणे महानगरपालिकेची स्वतःची पाणी पुरवठयाची स्थापित क्षमता २१० द.ल.लि. प्रती दिन एवढी होती. ही योजना पूर्ण झाल्यानंतर ठाणे महानगरपालिकेकडे एकूण ४७२ द.ल.लि. प्रती दिन एवढे पाणी उपलब्ध होते जी सन २०१५-१६ च्या लोकसंख्येस पुरेसे एवढे राहील.

**भावी दृश्य :** ठाणे महानगरपालिकेने ठाणे शहर वितरण व्यवस्था टप्पा १ व २ प्रकल्प हाती घेतला असून सदरचा प्रकल्प माहे डिसेंबर ०८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. तसेच महापालिकेचे अतिरिक्त ११० द.ल.लि. प्रतीदिन पाणी योजना ही सप्टेंबर २०१० अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. या योजना पूर्ण झाल्यानंतर महापालिकेच्या वितरणात सुधारणा होईल तसेच पाणी लेखापरिक्षण हाती घेतले असल्याने पाणी लेखापरिक्षण व त्याचा पुनर्वसन कार्यक्रम यामुळे वितरण व्यवस्थेतील त्रुटी कमी होण्यास मदत होईल. १०० % मिटरींग पद्धतीमध्ये पाण्याच्या बिलाची आकारणी ही मीटर पद्धतीने होणार असल्याने पाणी वितरण व्यवस्थेत नागरिकांमार्फत वापरल्या जाणा-या सर्व पाण्याचे परिमाणानुसार बिलिंग होईल त्याचप्रमाणे महानगरपालिकेने टेलिस्कोपिक दर निश्चित केले असल्याने जास्त वापर करणा-या ग्राहकाकडून त्याप्रमाणात अतिरिक्त दराने वसुली होणे अपेक्षित आहे. या सर्व बाबींमुळे महापालिकेचे पाणी पुरवठयापोटी जमा होणारे उत्पन्न वाढेल व पाण्याचे लेखापरिक्षामुळे पाणी खरेदीवरील ताण कमी होवून जमा खर्चातील तूट कमी होण्यास मदत होईल. यामुळे जमा खर्चातील तूट ही १५% ते २०% पर्यंत खाली आणणे शक्य होईल.

**ब ) मलनि:सारण :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे सन १९६६ साली जुनी योजना कार्यान्वीत केली तेव्हापासून ठाणे शहरामध्ये मलनिःसारण योजना अस्तित्वात आहे. सदर योजनेमध्ये १९८२ साली टप्पा १ अंतर्गत सुधारणा करण्यात आली व २००१ साली हे काम पूर्ण करण्यांत आले. सदर टप्पा १ अंतर्गतची मलनिःसारण योजना ४,८५,४८९ एवढया लोकसंख्येसाठी म्हणजेच आजच्या लोकसंख्येच्या ३८ टक्के लोकसंख्येसाठी कार्यान्वीत करण्यांत आली. अस्तित्वात असलेल्या मलनिःसारण प्रकल्पाची माहिती खालीलप्रमाणे.

१)    क्षेत्रफळ    १७ चौ.कि.मी.
२)    मलवाहिन्या    ६९.२ कि.मी.
३)    मॅनहोलस    २१७४
४)    उद्चंन केंद्र    ८
५)    मलशुद्धीकरण केंद्र    ५४ द.लि.लि
६)    विल्हेवाट    खाडी

**उत्पन्न :** सद्यस्थितीत महापालिकेस मलनिःसारण अंतर्गत मागील ५ वर्षात खालीलप्रमाणे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.

| तपशील | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|---|---|
| १. मलनिःसारण लाभकर | ३,४६,६५,७८८ | ५,०४,२६,९५७ | ५,३६,९७,४६६ | ६,६२,३४,०८० | ६,८९,३४,६७० |
| २. मलनिःसारण कर | ४,०२,४४,२४७ | ५,७९,९७,१७४ | ५,७४,०१,५६० | ५,७६,९९,०२८ | ७,५०,८६,८८६ |
| ३. आकार | १,८९,८५३ | ५,२२,७७८ | ४,६२,७९४ | ११,४१,४९३ | ३,०२,२७७ |
| एकूण | ७,५०,९९,८८८ | १०,८९,४६,९०९ | ११,१५,६१,८२० | १२,५०,७४,६०१ | १४,४३,२३,८३३ |

**२. देखभाल दुरुस्तीवरील खर्च :** मलवाहिन्या देखभाल दुरुस्तीवरील मागील ५ वर्षातील खर्च खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| १ | २००२-०३ | १,९७,७७,४९६ |
| २ | २००३-०४ | १,५५,६४,५५१ |
| ३ | २००४-०५ | १,८४,०३,७४१ |
| ४ | २००५-०६ | १,९४,३३,६५९ |
| ५ | २००६-०७ | २,७०,६२,१८८ |

**३. दायित्व :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पाणी पुरवठयासाठी उभारलेल्या कर्जामध्येच मलनिःसारण योजनेच्या कर्जाचा समावेश आहे.

अस्तित्वातील मलनिःसारण योजना ही महापालिकेच्या केवळ १७ चौ.कि.मी. मधील लोकसंख्येस पुरेशी असून संपूर्ण महापालिका हद्दीतील लोकसंख्येला भुयारी गटार योजनेच्या नेटवर्कमध्ये समाविष्ट करुन घेणेच्या दृष्टिने खालीलप्रमाणे प्रकल्प प्रस्तावित केलेले आहेत.

## नियोजित प्रकल्प :

### भुयारी गटार योजना फेज - १ :

ठाणे शहरामध्ये टप्पा १ अंतर्गत साधारणतः १४३ कि.मी. लांबीची मलवाहिनी प्रस्तावित आहे. टप्पा क्रमांक १ अंतर्गत उद्‌चन केंद्र क्रमांक १,२,३,५,६,७ व ८ येत आहेत. या योजनेसाठी एकूण १४९.५६ खर्च येणार असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १) | मलवाहिनी | रु. ७२.५७ कोटी |
| २) | उद्‌चन केंद्र | रु. २६.३८ कोटी |
| ३) | मलशुद्धीकरण केंद्र | रु. ४५.५६ कोटी |
| ४) | इतर | ५.०५ कोटी |

### भुयारी गटार योजना फेज - २ :

घोडबंदर रोड (मानपाडा पर्यंत) व कळवा विभागाअंतर्गत साधारणत: १२२.१९ कि.मी लांबीची मलवाहिनी प्रस्तावित आहे. टप्पा क्र. २ अंतर्गत उदचंन केंद्र क्र. ४,९,१०, के.एस १, के.एस २, के.एस ३, के.एस ४ येत आहेत. या योजनेसाठी एकूण १३६.५४ कोटी खर्च येणार असून त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १) मलवाहिनी टाकणे. | :- रु. ७०.६५ कोटी |
| २) उदंचन केंद्र बांधणे | :- रु. २२.२१ कोटी |
| ३) मलशुध्दीकरण केंद्र | :- रु. ३९.०६ कोटी |
| ४) इतर | :- रु. ०४.६२ कोटी |

### भुयारी गटार योजना फेज - ३ :

मुंब्रा विभागात टप्पा क्र. ३ अंतर्गत साधारण: २५.० कि.मी लांबीचे मलवाहिनी प्रस्तावित आहे. टप्पा क्र. ३ अतर्गत उदंचन केंद्र क्र. एम.पी.एस, एम.पी.एस२, एम.एम.पी.एस येत आहेत. या योजनेसाठी एकूण ३९.६३ कोटी खर्च येणार असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे अहे.

१) मलवाहिनी टाकणे :- रु. १४.६१ कोटी
२) उदचंन केंद्र बांधणे :- रु. ६.२६ कोटी
३) मलशुध्दीकरण केंद्र बांधणे :- रु. १७.४२ कोटी
४) इतर :- रु. १.३४ कोटी

**प्रस्तावित दर** : उपरोक्त नवीन प्रकल्प राबवित असतांना लाभार्थींकडून मलनिःसारण जोडणी शुल्क, मलनिःसारण कर व अनधिकृत मलवाहिनी जोडणी करणा-यांवर दंडात्मक कारवाई करणेबाबत मा.महासभेने ठराव क्रमांक १८२/१५ दि.१७.२.२००५ पारीत केला आहे. या ठरावान्वये मलनिःसारण आकार हा मासिक पाणी बिलाच्या ५०% याप्रमाणात आकारण्यांत येणार आहे. प्रस्तुत आकार मलनिःसारण जोडण्या पूर्ण झाल्यानंतर आकारण्यांत येणार आहे. प्रस्तावित आकारणीमुळे अ अंदाजपत्रकातील वर्ग करावयाची रक्कम कमी प्रमाणात करावी लागेल.

**देखभालीवरील खर्च** : नियोजित प्रकल्प कार्यान्वीत झाल्यानंतर सदर प्रकल्पाच्या देखभाल दुरुस्तीकरीता वार्षिक १५ % ते २०% खर्च अपेक्षित आहे.

**<u>शिफारशी व कृती योजना :</u>**

**१.** प्रवर्ती गुणोत्तर १ इतके साध्य करावे.

२. चालू आणि नियोजित भांडवली कामांच्या परिणामी उद्ववणा-या गर्भितार्थासाठी तरतूद करावी.

३. अर्थसहाय्ये लक्षित करावी आणि लाभांच्या तुलनेत समन्याय उद्दिष्टांच्या वाटपाच्या पद्धतीवर नजर ठेवावी.

## दोन ) घनकचरा व्यवस्थापन :

**प्रस्तावना :**

शहरात दररोज ५५० ते ६०० टन घनकचरा निर्माण होतो आणि महानगरपालिका तो नियमितपणे गोळा करते. हे काम करण्यासाठी महानगरपालिकेत २४४४ कर्मचारी ( महानगरपालिकेतील कर्मचारी वर्गाच्या एकूण संख्येच्या ३०% टक्के आहेत.) घनकच-याशी निगडीत काम आरोग्य विभागाकडून केली जात होती परंतु आता घनकचरा विभाग स्वतंत्र विभाग असून त्याचे स्वतंत्र अंदाजत्रक ठेवण्यांत आले आहे.

**उत्पन्न व खर्च :** घनकच-याशी निगडीत कामापासून मिळणारे उत्पन्न हे मुख्यतः विशेष सफाई कर, विशेष स्वच्छता विषयक उपकर आणि कचरा करण्याबद्दल दंड यांपासून मिळते.

घनकच-यावर होणारा खर्च हा मुख्यतः वेतन, इंधन, वाहन खरेदी, खाजगी क्षेत्राच्या सहभागाबद्दल करावयाची प्रदाने इत्यादींवर होतो. शहरातील ११२ कि.मी. लांबीचे रस्त्यांचे जाळे झाडून काढण्यासाठी खाजगी क्षेत्राची नेमणूक करण्यांत आली आहे.

भांडवली खर्च हा प्रामुख्याने वाहन व यंत्र सामुग्री खरेदीवर झालेला असून तो ही महसुली खर्चातच समाविष्ट करण्यांत आला आहे.

**उत्पन्न व खर्च यातील तफावत :**

घनकचरा क्षेत्रापासून मिळणारे उत्पन्न हे नगण्य असून उत्पन्न व खर्च यातील तफावत ही घनकच-यापासून मिळणा-या उत्पन्नाच्या ९९ टक्के पर्यंत आहे.

**नियोजित प्रकल्प :** घनकचरा व्यवस्थापन विभागाचे कामकाज हे नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० करणे बंधनकारक असल्याने त्यासाठी करावा लागणा-या कामांचा प्रकल्प अहवाल तयार करण्यांत आला आहे. त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | प्राथमिक संकलन व साठवणूक | रु. ७ कोटी ६८ लक्ष |
| २. | वाहतूक व्यवस्था | रु.१७ कोटी ९५ लक्ष |
| ३. | हस्तांतरण स्थानक | रु. ७ कोटी २८ लक्ष |
| ४. | नविन भूमीभरण साईटवर मुलभूत सुविधा | रु. ६ कोटी ६५ लक्ष |
| ५. | सद्याचे भूमीभरण साईट रेमिडिएशन | रु. ७ कोटी ५० लक्ष |
| ६. | शास्त्रोक्त भूमीभरण साईट तयार करणे | रु. ६ कोटी ७३ लक्ष |
| ७. | मेलेली जनावरे विल्हेवाट | रु. १ कोटी ९० लक्ष |
| ८. | पर्यावरण मॉनिटरींग लिचिट सॅम्पलिंग | रु. १ कोटी ६८ लक्ष |
| ९. | कर्मचारी निवासस्थाने आरोग्य सुरक्षा | रु. ८० लक्ष |
| १०. | आरोग्य शिक्षण नागरिकांचा सहभाग प्रसिद्धी | रु. १ कोटी ३५ लक्ष |
| ११. | हस्तांतरण स्थानक, यार्ड विद्युतीकरण | रु. १ कोटी १० लक्ष |
| १२. | कच-यावर प्रक्रिया करणेसाठीचा प्रकल्प | रु. ३० कोटी |
| | **एकूण** | **रु.९० कोटी ६३ लक्ष** |
| | अकस्मिक खर्च ३% +प्रशासकीय खर्च ०.५०% | रु. ३ कोटी १७ लक्ष |
| | **एकूण** | **रु. ९३ कोटी ८० लक्ष** |

**भावी दृश्य :** घनकचरा संकलन, वाहतूक व विल्हेवाट यासाठी येणारा खर्च विचारात घेता घनकच-यापासून खालीलप्रमाणे उत्पन्न अपेक्षित आहे.

❖ करयोग्य मुल्यावर सरसकट ३% घनकचरा व्यवस्थापन आकार लावणेबाबत प्रस्तावित करण्यांत येत आहे. या व्यतिरिक्त मोठया प्रमाणात कचरा निर्माण करणा-या मालमत्तांवर यापुर्वी लावलेला विशेष साफसफाई कर कार्यरत राहील. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील जमा खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे राहील.

| | **२००८-२००९** | **२००९-२०१०** | **२०१०-२०११** |
|---|---|---|---|
| जमा | रु.३.५१ कोटी | रु. ३.८० कोटी | रु.४.२५ कोटी |
| महसुली खर्च | रु. ६३ कोटी | रु. ७० कोटी | रु. ७५ कोटी |
| भांडवली खर्च | रु.३९ कोटी | रु. १६ कोटी | रु.६ कोटी |

**शिफारशी व कृती योजना :**घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी ) नियम २००० अनुसार करावयाच्या कार्यवाहीसाठी लोकसहभाग, कामांचे खाजगीकरण करण्यांत येणार असून नियमांप्रमाणे कार्यक्रम राबविण्यांत येतील.

## ३ ) रस्त्यावरील दिवाबत्ती :

**प्रस्तावना :** महापालिका ही सेवा १०० % अनुदानित अर्थसहाय्य देवून पुरविते. नागरिकांच्या सोयीसाठी ठाणे शहरातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्त्यांवर २८७३२ पथदिप व ५२ हायमास्ट दिवे बसविण्यांत आले आहेत. यामध्ये महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्ते व झोपडपट्टयांमधील रस्त्यांचा समावेश आहे. विद्युत पुरवठयाचा मुख्य स्त्रोत MSEDCL हा आहे. त्यांना विजेच्या आकारापोटी मागील वर्षात अदा केलेली रक्कम खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| २००२-०३ | ५,६९,५२,८६२ |
| २००३-०४ | ५,१७,७४,२२६ |
| २००४-०५ | ५,४७,३८,७१९ |
| २००५-०६ | ४,७०,३८,०१७ |
| २००६-०७ | ५,१४,०७,७४४ |

तसेच रस्त्यावरील दिव्यांची देखभाल व दुरुस्तीकरीता मागील ५ वर्षात खालीलप्रमाणे खर्च करण्यांत आलेला आहे.

| | |
|---|---|
| २००२-०३ | ४,५६,५२,७७८ |
| २००३-०४ | २,४५,६८,८८९ |
| २००४-०५ | २,०८,९०,८५७ |
| २००५-०६ | २,४८,९९,९२८ |
| २००६-०७ | २,४६,१२,१४६ |

**<u>ऊर्जा बचतीच्या उपाय योजना :</u>**

ठाणे महानगरपालिकेने सन २०००-२००१ पासून ऊर्जा बचत व ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रामध्ये विशेष मोहिम हाती घेतली आहे.

१) महापालिकेने विज बचतीसाठी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. यामध्ये पथदिपाच्या पॅनेलमध्ये मायक्रोप्रोसेसर वर आधारित अत्याधुनिक टायमर बसविणे, उच्च दाबाचे विज कनेक्शनमध्ये पॉवर फॅक्टर वाढवून विज बिलात बचत करणे, इमारतीमधील विद्युतीकरणात टि - ८ टयूब लाईट इलेक्ट्रॉनिक चोकसह बदली करणे आणि विविध इमारतींमधील वातानुकुलित यंत्रणेमध्ये तांत्रिक सुधारणा करण्यांत आल्या आहेत. या मोहिमेंतर्गत मार्च २००६ अखेर पर्यंतच्या ५ आर्थिक वर्षामध्ये सन २०००-२००१ या मूळ वर्षाच्या तुलनेत महापालिकेच्या विज बिलामध्ये रु. १५ कोटी इतक्या रकमेची लक्षणीय बचत झालेली आहे. या दरम्यान विद्युत भारातही लक्षणीय वाढ झाली असता, विज बचत करण्यांत आली आहे.

**२) सौर ऊर्जा :** सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या दृष्टिने महापालिकेच्या मंजूर विकास नियमावलीमध्ये सुधारणा करण्यांत आली आहे. त्यानुसार अस्तित्वातील निवासी वगळता सर्व इमारतींवर सौर ऊर्जेवर आधारित पाणी गरम करण्याचे प्रकल्प उभारणे बंधनकारक केले आहे. सदर संयंत्रे बसविल्यास अशी यंत्रणा सुस्थितीत कार्यान्वीत असेपर्यंत संबंधितांना वार्षिक मालमत्ता करामध्ये सूट दिल्यामुळे आतापर्यंत ६५२० निवासस्थान व २० वाणिज्य संकुल येथे सौर ऊर्जेवर आधारित पाणी गरम करण्याची यंत्रणा कार्यान्वीत झाली असल्याने वार्षिक अंदाजे १२ मिलियन युनिट वीज बचत होत आहे.

३)	ठाणे महानगरपालिकेने स्वतःच्या इमारतीवर ३५,५०० लिटर प्रतीदिन सौर ऊर्जेवर आधारित पाणी गरम करण्याची यंत्रणा कार्यान्वीत केली असून त्यामुळे वार्षिक रु. १५ लक्षची बचत होत आहे.

४)	ठाणे महानगरपालिका क्षेत्रांतर्गत २० टन ओला कचरा वापरुन मिथेन गॅस प्रकल्प कार्यान्वीत करणेचा प्रकल्प तयार करण्यांत आला आहे. या प्रकल्पामुळे ६०० घनमीटर मिथेन गॅसची निर्मिती होत आहे.

५)	२१ सीएनजी बसेस कार्यरत झाल्या आहेत.

**भावी दृश्य :** उपरोक्त नमूद केलेल्या ऊर्जा बचतीच्या उपाय योजनांमुळे विद्युत खर्चामध्ये बचत होणार आहे.

**शिफारशी व कृती योजना** : ठाणे शहराच्या १५ लक्ष लोकसंख्येपैकी फक्त २५% लोकसंख्येने सौर ऊर्जा आधारित पाणी गरम करण्याची यंत्रणा उभारल्यास खालील प्रमाणे फायदे होतील.

- **ठाणे शहरात अंदाजित १३५ मिलियन युनिट वार्षिक वीज बचत होईल. ही वीज बचत शहराच्या एकूण वीज वापराच्या १५ टक्के आहे.**
- **सकाळच्या वेळेत विद्युत वितरण कंपनीचे ७५ के.व्ही.अे.डिमांड कमी होईल. (ठाणे शहराच्या एकूण डिमांडच्या २६ % )**
- **वरील वीज बचतीमुळे प्रतीवर्षी १३० टन $CO_2$ गॅसेसचे ऊत्सर्जन थांबविण्यांत येईल.**
- **राम गणेश गडकरी रंगायतन येथील मध्यवर्ती वातानुकुल यंत्रणेत सुधारणा करण्यांत येत असून वीज बचत करणारी रेफ्रीजेरंन्ट यंत्रणा वापरुन वातानुकुलन यंत्रणेचे नुतनीकरण करण्यांत येत आहे. यामुळे विद्युत डिमांड कमी होवून वीज बिलात कपात होईल.**